महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२८२१६८१

क्रमांक: राक्रीधो २०१८/प्र.क्र.७२/क्रीयुसे-२
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २७ ऑगस्ट,२०१८

प्रति,
आयुक्त,
क्रीडा व युवक सेवा,
महाराष्ट्र राज्य,पुणे

विषय: शालेय क्रीडा स्पर्धेत आयोजित करावयाच्या खेळ प्रकारांच्या निश्चितीबाबत

संदर्भ:- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,शासन निर्णय क्रमांक राक्रीधो२०१२/प्र.क्र.१८२/भाग-१/क्रीयुसे-२; दिनांक ३१ मार्च,२०१७

संदर्भाधीन शासन निर्णयान्वे भारतीय शालेय खेळ महासंघ यांनी एखाद्या नवीन खेळाचा समावेश केल्यास त्या खेळांच्या स्पर्धा राज्यात आयोजित करण्याचे अधिकार शासनास आहेत.

२. त्यानुसार सन २०१८-१९ या वर्षी सोबतच्या परिशिष्टात नमूद खेळांच्या स्पर्धा राज्यात आयोजित करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

(आ.रा.राजपूत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवड नस्ती (क्रीयुसे-२)

c:\users\nilima.shinde\desktop\chetan\संकीर्ण.docx

शासन पत्र क्रमांक:राक्रीधो २०१८/प्र.क्र.७२/क्रीयुसे-२;दिनांक २७ ऑगस्ट,२०१८सोबतचे,

परिशिष्ट

| अ.क्र. | खेळ प्रकार | अ.क्र. | खेळ प्रकार |
|---|---|---|---|
| ऑलिम्पिक/एशियन/कॉमनवेल्थ मध्ये समाविष्ट असणारे खेळ प्रकार | | | |
| १. | आर्चरी | २ | ॲथलेटिक्स |
| ३ | बॅडमिंटन | ४ | वेटलिफ्टींग |
| ५ | बास्केटबॉल | ६ | बॉक्सींग |
| ७ | सायकलींग | ८ | तलवारबाजी |
| ९ | फुटबॉल | १० | जिम्नॅस्टिक |
| ११ | हॅन्डबॉल | १२ | हॉकी |
| १३ | ज्युदो | १४ | व्हॉलीबॉल |
| १५ | लॉन टेनिस | १६ | रायफल शुटींग |
| १७ | टेबल टेनिस | १८ | तायक्वांदो |
| १९ | जलतरण | २० | कुस्ती |
| २१ | कबड्डी | २२ | सॉफ्टबॉल |
| २३ | बेसबॉल | २४ | नेटबॉल |
| २५ | कराटे | २६ | स्क्वॅश |
| २७ | वुशू | २८ | नेहरू हॉकी |
| २९ | सुब्रतो फुटबॉल | ३० | रग्बी |
| ३१ | सेपेक टकारा | ३२ | मॉडर्न पेन्टेथलॉन |
| ३३ | सॉफ्ट टेनिस | *********** | |
| ऑलिम्पिक/एशियन/कॉमनवेल्थ मध्ये समाविष्ट नसणारे खेळ प्रकार | | | |
| ३४ | मल्लखांब | ३५ | खो-खो |
| ३६ | बॉलबॅडमिंटन | ३७ | कॅरम |
| ३८ | बुध्दीबळ | ३९ | क्रिकेट |
| ४० | थ्रोबॉल | ४१ | रोल स्केटींग/हॉकी |
| ४२ | योगासन | ४३ | किक बॉक्सींग |
| ४४ | सिकई | ४५ | रोलबॉल |
| ४६ | डॉजबॉल | ४७ | शुटींगबॉल |
| ४८ | टेनीक्वाइट | ४९ | आट्या-पाट्या |

***************************

महाराष्ट्र शासन

अतितात्काळ:

दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२८२१६८१ क्रमांक: संकीर्ण १७१५/प्र.क्र.६५ भाग-१/क्रीयुसे-२

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३ नोव्हेंबर,२०१८

प्रति,
आयुक्त,
क्रीडा व युवक सेवा,
महाराष्ट्र राज्य,पुणे

विषय: स्थगिती दिलेल्या खेळ प्रकारांच्या क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाबाबत

संदर्भ:-१. आपले पत्र क्रमांक क्रीयुसे/शाक्रीस्पर्धा/न्याप्र/का.४/४५२५,
दिनांक:- १९ ऑक्टोबर,२०१८

२. शासन पत्र क्रमांक:-शाक्रीस १७१८/प्र.क्र.६५/क्रीयुसे-२,
दिनांक: २२.०६.२०१८

३. मा.उच्च न्यायालय,खंडपीठ नागपूर येथे दाखल याचिका क्रमांक:-
६८३/२०१८,५११०/२०१८,५१११/२०१८,२१०२/२०१८,२१०३/२०१८,२१०४/२०१८,२१०५/२०१८ व अवमान याचिका क्रमांक १८२/२०१८

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने स्पर्धा घेण्याकरिता आदेशित केलेल्या क्रीडा प्रकारांच्या राज्य स्तरापर्यंतच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन त्या त्या खेळांच्या एकविध खेळ संघटनेमार्फत करून राज्याचा प्रातिनिधिक संघ राष्ट्रीय स्पर्धेत संचालनालयामार्फत पाठविण्यास मान्यता देण्याची विनंती संदर्भाधीन पत्रान्वये केली आहे.

२. संदर्भाधीन क्रमांक २ च्या पत्रान्वये शासनाने,शालेय क्रीडा स्पर्धेत "अष्टे डू आखाडा" या खेळ प्रकारचा समावेश न करण्याचा निर्णय घेतला आहे.तथापि मा. न्यायालयात स्पर्धा आयोजनासाठी कुडो व इनडोअर आर्चरी या खेळ संघटनांनी दाखल करण्यात आलेल्या अनुक्रमे याचिका क्र.५११०/२०१८ व ५१११/२०१८ मध्ये मा.उच्च न्यायालय,खंडपीठ नागपूर यांनी दि.७.९.२०१८ रोजी खालीप्रमाणे आदेशित केले आहे :-

In so far as regulation of selection of team for participation in National events or then consideration of rival claims for such participation is concerned, since, representation will be that of state of Maharashtra, it may be in the fitness of things that respondent no 2 evolves a mechanism may already be available, because about 43 games are recognized.

This exercise may also therefore, require some policy making. In view of the statement made by petitioner that they are ready and willing to bear the burden, we direct respondent no 1 to consider the difficulties faced by petitioners and to evolve a proper policy in this respect in next two months. This time bound direction has

c:\users\nilima.shinde\desktop\chetan\~wrl0003.tmp

become essential, because for academic session 2017-18, there was no participation in these games from state of Maharashtra.

मा.न्यायालयाने दिलेले सदरचे आदेश विचारात घेता प्रतिवादी क्रमांक २ (आयुक्त,क्रीडा व युवक सेवा,पुणे) यांनी कुडो व इनडोअर आर्चरी या खेळांचे संघ राष्ट्रीयस्तर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी, संदर्भाधीन पत्र क्रमांक १ सोबत शासनास सादर केलेल्या कार्यपध्दतीस, शासनाची मान्यता देण्यात येत आहे.मा.न्यायालयाने आदेशित केलेल्या इतर खेळ प्रकारांच्या आयोजनासंदर्भात देखील सदरची कार्यपद्धती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार अष्टे डू आखाडा या खेळ प्रकारचे आयोजन शालेय क्रीडा स्पर्धेत खालील परिच्छेदातील अटींच्या अधीन राहून करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर प्रकरणी खालील प्रमाणे कार्यवाही करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे.:-

"शासनामार्फत ज्या खेळ प्रकारांच्या शालेय क्रीडा स्पर्धेतील आयोजनास,मान्यता देण्यात आली आहे ,त्या खेळ प्रकारामधून महाराष्ट्र राज्याचा संघ, राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी ज्या कार्यपध्दतीनुसार निवडला जातो, त्या कार्यपध्दतीनुसार आष्टे डू आखाडा, युनिफाईट, गॉटेक्सबॉल क्रीकेट, स्पीडबॉल, तांग सू डो, फिल्ड आर्चरी व कुडो या खेळांचे संघ राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत पाठविण्यात यावेत. तथापि सदर खेळाच्या जिल्हा, विभाग व राज्यस्तरापर्यंतच्या स्पर्धा आयोजनाची प्रशासकीय, तांत्रिक व आर्थिक जबाबदारी संपूर्णपणे संबंधित खेळ संघटनेचे राहील. परंतु सदर खेळ प्रकारातील प्राविण्य प्राप्त खेळाडूंना खालील योजनांचे लाभ अनुज्ञेय असणार नाहीत:-

I. शासकीय तसेच अशासकीय नोकऱ्यांमधील ५ टक्के खेळाडू आरक्षण
II. क्रीडा गुण सवलत
III. शिष्यवृत्ती
IV. रोख पारितोषिके व इतर कोणतेही पुरस्कार
V. इयत्ता ११ वी च्या प्रवेशाकरिता खेळाडू आरक्षण
VI. संघटनेमार्फत आयोजित स्पर्धांसाठी शासनाचे मनुष्यबळ,आर्थिक व तांत्रिक मदत उपलब्ध करून दिली जाणार नाही.

३. शासनाच्या उपरोक्त निदेशांच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-
१. सर्व संबंधित खेळ संघटनेचे अध्यक्ष/सचिव, (संचालनालयामार्फत)
२. सर्व उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा (संचालनालयामार्फत)
३. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, (संचालनालयामार्फत)

प्रत माहितीस्तव:-
१. मा.मंत्री,शालेय शिक्षण व क्रीडा यांचे स्वीय सहायक,
२. अ.मु.स.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई
३. निवड नस्ती,क्रीयुसे-२

c:\users\nilima.shinde\desktop\chetan\~wrl0003.tmp